पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेनना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १४ वा | मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘अमित शाह जवाब दो, लाठी का हिसाब दो’

## विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खा प्रणिती शिंदे यांचा मोदी सरकारविरोधात हल्लाबोल

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांच्यावर लाठीमार आणि गोळीबार करणारे सरकार विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सामोरे जाण्यात अपयशी ठरले आहे, असा जोरदार हल्लाबोल करत काँग्रेससह विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसद परिसरात केंद्रातील मोदी सरकारविरोधात तीव्र आंदोलन केले.

विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज आणि दडपशाहीच्या निषेधार्थ काँग्रेस नेते राहुलजी गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह इंडिया आघाडीतील विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात जोरदार निदर्शने केली.

यावेळी आंदोलक खासदारांनी ह्लअमित शाह जवाब दो झ्र लाठी का हिसाब दोह्व अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचा जाब केंद्र सरकारने द्यावा आणि या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी विरोधी खासदारांनी केली.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी त्यांच्यावर लाठीमार आणि दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर हे सरकार विद्यार्थ्यांचा आवाज ऐकण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाचा मोदी सरकारला हिशोब द्यावाच लागेल, असा इशारा यावेळी विरोधी खासदारांनी दिला.

या आंदोलनात राहुलजी गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे खासदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पेपरफुटीच्या मुद्द्यावर विरोधकांनी सरकारला घेरले

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोमवारी सरकारने पेपरफुटी विरोधी विधेयक सादर केले. डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक सादर केले. पेपरफुटीच्या मुद्द्यावर विरोधकांनी सरकारला घेरले असून संसदेत गदारोळ सुरूच आहे.

त्यामुळे लोकसभेचे कामकाज तिसऱ्यांदा स्थगित करण्यात आले आहे.

## पेपरफुटीच्या मुद्द्यावर विरोधकांनी सरकारला घेरले

### विधेयकावर आज होणार चर्चा





सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाचा दुसरा आठवडा आजपासून सुरू होत आहे. नीट पेपरफुटी प्रकरण आणि विद्यार्थी आंदोलनादरम्यान पहिला आठवडा वादळी ठरल्यानंतर सोमवारी दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सरकारने लोकसभेत एक विधेयक सादर केले आहे. त्यात अधिक कठोर कायदेशीर तरतुदी आहेत. विरोधक पेपरफुटीप्रकरणी आक्रमक झाला आहे.

पेपरफुटीच्या मुद्द्यावर विरोधी पक्ष आक्रमक असताना धर्मेंद्र प्रधान संसदेत आले. पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारले. मात्र, मोन बाळगत उत्तरे देणे टाळले आणि उत्तर न देताच संसद परिसरातून निघून गेले. शनिवारी पदाचा राजीनामा दिल्यानंतर पहिल्यांदाच संसदेत दाखल झालेले माजी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, संसद भवनातून बाहेर आल्यावर त्यांना अनेक प्रश्न विचारण्यात आले, पण ते गप्प राहिले.

राज्यसभेतही गोंधळाचे वातवारण होते. काँग्रेस खासदारांनी विद्यार्थी आंदोलनावरील लाठीचार्जचा मुद्दा उपस्थित केला. काँग्रेसचे उपनेते प्रमोद तिवारी यांनी हा मुद्दा उपस्थित करून गृहमंत्री अमित शाह यांच्याकडून उत्तराची मागणी केली. विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे राज्यसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीपासून निर्माण झालेली सत्ताधारी आणि विरोधकांमधील कोंडी आता सुटली आहे. विरोधी पक्ष पेपरलिक विरोधी विधेयकावर चर्चा करण्यास सहमत झाले आहेत. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पुढाकारानंतर प्रमुख राजकीय पक्षांच्या सभागृह नेत्यांनी सभागृहात पेपरफुटी प्रतिबंधक विधेयकावर चर्चा करण्यास सहमती दर्शवली आहे.

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत पेपरलिक विरोधी विधेयक सादर केले होते. मात्र, विधेयकावरील चर्चा सुरू होऊ शकली नाही. चर्चेपूर्वी सभागृहात गृहमंत्री अमित शाह यांच्या निवेदनाबाबत विरोधी पक्षांनी आग्रह धरला होता. पेपरफुटीविरोधी सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) विधेयक, २०२६, यावर मंगळवारी सभागृहात चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे.

सभागृहाच्या कामकाजादरम्यान, अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्व पक्षांना आवाहन केले की, हा मुद्दा देशातील लाखो विद्यार्थी आणि तरुणांशी, तसेच स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेशी संबंधित आहे. त्यामुळे, या विषयावर एक व्यापक आणि अर्थपूर्ण चर्चा होणे गरजेचे आहे.


अध्यक्षांनी सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षांना चर्चा करून सायंकाळी ५ वाजेपर्यंत चर्चा सुरू करण्याचा मार्ग शोधण्याचे आवाहनही केले. त्यानंतर अध्यक्षांनी विविध राजकीय पक्षांच्या सभागृह नेत्यांशी संवाद साधला. परिणामी, सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्ष विधेयकावर चर्चा करण्यास सहमत झाले आणि मंगळवारी दुपारी १२ वाजता विधेयकावर सविस्तर चर्चा सुरू करण्याचे ठरले.

या विधेयकाचा उद्देश सार्वजनिक परीक्षांमधील पेपरफुटी, कॉपी, संघटित परीक्षा माफिया आणि इतर गैरप्रकारांना प्रभावीपणे आळा घालणे हा आहे. मंगळवारच्या चर्चेदरम्यान, विविध पक्ष विधेयकाच्या तरतुदींवर आपल्या सूचना आणि दुरुस्त्या देखील मांडू शकतात. चर्चेनंतर, सरकार या सूचनांना प्रतिसाद देईल आणि त्यानंतर विधेयक मंजुरीसाठी सभागृहात सादर केले जाईल.

पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी दुपारी १२ वाजता लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर हे विधेयक सादर केले. विरोधी पक्षांच्या गदारोळात डॉ. जितेंद्र सिंह यांनी हे विधेयक सादर केले आणि अध्यक्षांच्या आवाहनानंतरही विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्येच थांबले. अध्यक्षांनी प्रथम दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर सायंकाळी ५ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केले.

## उजनीतून भीमा नदीत 30 हजार क्युसेकचा विसर्ग सुरु

### नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांसाठी एक दिलासादाक बातमी समोर आली आहे. उजनी धरणाची वाटचाल शंभरीकडे सुरु झाली आहे. उजनी धरण 98 टक्के भरले आहे. पुणे परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे उजनी धरण 98 टक्के भरले आहे.

उजनी धरणातून सध्या भीमा नदीत 30 हजार क्युसेक विसगार्ने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

उजनी धरणात तब्बल 65 हजार क्युसिक विसर्गाने पाणी जमा होत आहे

अजूनही उजनी धरणात तब्बल 65 हजार क्युसिक विसर्गाने पाणी जमा होत असल्याने भीमा नदीत सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. यामुळे प्रशासनाने नदीकाठच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा दिलेला आहे. विशेषतः पंढरपूर मध्ये अजूनही आषाढी यात्रेला आलेल्या भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी असून हे भाविक चंद्रभागा स्नानासाठी जात असल्याने प्रशासनाची काळजी वाढली आहे. उजनी धरणातून सोडण्यात येत असलेला हा (पान 2 वर..)

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या ३ आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय मानांकन

### आता गावातच मिळणार शहरासारखे उपचार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रुग्णांना आता गावपातळीवरच मोफत, सुरक्षित आणि उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळणार आहेत. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दिल्या जाणाऱ्या 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनात' (एनक्यूएएस) सोलापूर जिल्हा परिषदेच्या तीन आयुष्मान आरोग्य मंदिरांनी राष्ट्रीय दर्जा पटकावला आहे.

पहिल्यांदाच जिल्हा परिषदेला प्रथमच हा बहुमान मिळाला आहे. विशेष म्हणजे, यंदा जिल्हा शल्यचिकित्सक आणि महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमधून निवड झाली नसताना जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने ही कामगिरी केली आहे.




‘जल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांना एनक्यूएएस मानांकन मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. जनतेला गावातच दर्जेदार आणि सुरक्षित आरोग्य सेवा देण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू राहतील.’

**- कुशल जैन,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

रुग्णकेंद्रित सेवा, स्वच्छता, सुरक्षितता आणि प्रभावी व्यवस्थापन या निकषांवर हे मानांकन दिले जाते. या मूल्यांकनात दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणारे मुस्ती (८४.३१ टक्के), तसेच मोहोळ तालुक्यातील पाटकुल केंद्राअंतर्गत (पान 2 वर..)

## सोलापूरच्या युवा चित्रकार कांचन गोडाळे यांच्या ‘चित्रांकन’ प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या युवा चित्रकार कांचन गोडाळे यांच्या ‘चित्रांकन’ या भव्य चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन मंगळवार, दि. २८ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत डफरीन चौक येथील पू. ना. गाडगीळ अँड सन्स येथे करण्यात आले आहे. विविध कलाशैलींचा संगम असलेल्या या प्रदर्शनात मंडला आर्टसह आध्यात्मिक, पारंपरिक आणि आकर्षक चित्रकृतींचा अनोखा संग्रह कला रसिकांना पाहायला मिळणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवार, दि. २८ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता प्रसिद्ध हास्यसम्राट व चित्रकार दीपक देशपांडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गायकवाड हे असतील.



यावेळी ज्येष्ठ चित्रकार डॉ. पद्मा देशपांडे, पू. ना. गाडगीळ अँड सन्स चे हेड सेल्स जितेंद्र जोशी तसेच डॉ. लता गोडाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

प्रदर्शनामध्ये मंडला आर्टबरोबरच भारतीय संस्कृती, अध्यात्म, पारंपरिक विषय तसेच विविध भावविश्व उलगडणाऱ्या आकर्षक चित्रकृती प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. चित्रकलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच नवोदित कलाकारांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे प्रदर्शन दि. २८ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ११ ते रात्री ८.३० या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

कला रसिक, विद्यार्थी, नागरिक तसेच चित्रकलेची आवड असलेल्या सर्वांनी या प्रदर्शनास आवर्जून भेट देऊन कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन युवा चित्रकार कांचन गोडाळे यांनी केले आहे.

## महापौरांच्या प्रभागातच विद्यार्थ्यांची चिखलयात्रा

## विकासाच्या दाव्यांना नागरिकांचा सवाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या विकासासाठी मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांची अभ्यासू, शांत, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख आहे. मात्र त्यांच्या प्रभाग क्रमांक १२ मधील तिरूमला चौक ते थोबडे वस्ती हा मुख्य रस्ता गेल्या १० ते १५ वर्षांपासून दुरवस्थेत असल्याने त्यांच्या विकासाच्या प्रतिमेलाच प्रश्न उपस्थित होत आहेत. या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, कामगार आणि शेकडो नागरिकांना चिखल, साचलेले पाणी आणि खड्ड्यांतून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावरून नेताजी शाळा, महात्मा विद्या मंदिर तसेच विविध महाविद्यालयांमध्ये जाणारे विद्यार्थी सायकलीवरून प्रवास करतात. चिखलामुळे त्यांच्या गणवेशावर घाण उडते, अनेकदा घसरून अपघात होण्याची भीती निर्माण होते.




कामगार वर्गालाही दररोज याच हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. वर्षानुवर्षे केवळ मुरूम व माती टाकून तात्पुरती दुरुस्ती केली जाते; मात्र कायमस्वरूपी रस्ता करण्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. या रस्त्याची दुरवस्था वाढण्यामागे महापालिकेच्या पाणीपुरवठ्यावेळी रस्त्यावर वाहणारे पाणी आणि परिसरातील काही कारखान्यांकडून रस्त्यावर सोडले जाणारे सांडपाणी हेही प्रमुख कारण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी हा रस्ता वर्षभर चिखलमय राहतो. पाणीगळती तातडीने थांबवून संबंधित कारखानदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी परिसरातून जोर धरत आहे महापौर विनायक कोंड्याल यांनी गेली अनेक वर्षे या प्रभागाचे नेतृत्व केले असून नागरिकांनी त्यांच्यावर सातत्याने विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या प्रभागातील हा मूलभूत प्रश्न तातडीने मार्गी लागणे हीच नागरिकांची अपेक्षा आहे. शहराच्या विकासाचे नेतृत्व करणाऱ्या महापौरांनी सर्वप्रथम आपल्या प्रभागातील या मुख्य रस्त्याचा प्रश्न सोडवून विद्यार्थी, कामगार आणि नागरिकांना चिखलमुक्त व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी प्रामाणिक भावना स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली आहे. नागरिकांचा विश्वास, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि कामगारांचा दैनंदिन प्रवास या तिन्ही गोष्टींशी निगडित असलेला हा प्रश्न आता आणखी लांबविणे योग्य ठरणार नाही. महापालिका प्रशासनाने पाणीगळतीची कारणे तातडीने शोधून ती बंद करावीत, नियमभंग करणाऱ्या कारखानदारांवर कठोर कारवाई करावी आणि तिरूमला चौक ते थोबडे वस्ती हा रस्ता कायमस्वरूपी दर्जेदार पद्धतीने विकसित करावा, अशी एकमुखी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## एआय तंत्रज्ञानाचा वापर करून पंढरपूर आषाढी वारीत 32 लाख भाविकांची अचूक मोजणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी वारी 2026 मध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने सुरक्षेसोबतच गर्दी व्यवस्थापनात एक ऐतिहासिक आणि अत्याधुनिक टप्पा गाठला आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली यंदाच्या वारीत सेंटियंट लॉजिक्स या तंत्रज्ञान संस्थेच्या मदतीने अत्याधुनिक 'कॉग्निटिव्ह व्हिज्युअल ह्युमन न्यूरल एआय' तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर करण्यात आला. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 24 ते 26 जुलै दरम्यान पंढरपुरात दाखल झालेल्या 3198129 (सुमारे ३२ लाख) भाविकांची अचूक नोंद करण्यात आली आहे.

### तीन दिवसांतील वारकरी आगमनाची अचूक आकडेवारी

एआय प्रणालीने केलेल्या अचूक मोजणीनुसार तीन दिवसांत पंढरपुरात आलेले भाविकः




- 24 जुलै 2026 रोजी 6,75,274 वारकरी
- 25 जुलै 2026 (आषाढी एकादशी) रोजी 18,96,573 वारकरी
- 26 जुलै 2026 रोजी 6,26, 282 वारकरी
- असे एकूणः 31, 98,129 वारकरी भाविकांची नोंद करण्यात आली

आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच दि. 25 जुलै रोजी सर्वाधिक सुमारे 19 लाख वारकऱ्यांनी पंढरपुरात प्रवेश केल्याचे या नोंदीवरून स्पष्ट झाले आहे.

### दुबार मोजणी टाळणारे आधुनिक एआय तंत्रज्ञान

पारंपरिक कॅमेरा पद्धतीमध्ये एकच व्यक्ती विविध कॅमेऱ्यांसमोर आल्यास आकडेवारी फुगण्याची शक्यता असते. मात्र, सोलापूर ग्रामीण पोलिसांनी वापरलेल्या एआय प्रणालीने ही दुबार नोंद पूर्णपणे टाळली. मुख्य प्रवेशद्वारांवर एआय आयडेंटिटीः सरगम चौक ते इंदिरा गांधी चौक, तीन रस्ता ते दगडी पूल, गोपाळपूर पूल, सावरकर चौक व मिलिटरी हॉस्टेल आणि सांगोला चौक एन्ट्री चा पाचवा मुख्य मार्गावर खास एआय कॅमेरे बसवण्यात आले होते. व्यक्तीचा चेहरा, कपड्यांचा रंग आणि टोप्यांचा ताळमेळ लावून प्रत्येक वारकऱ्याची एक 'युनिक एआय ओळख' तयार केली जात होती. (पान 2 वर..)

## संपादकीय

# सत्तेपेक्षा मोठा ठरला विद्यार्थ्यांचा आवाज

महिनाभरातील घटनाक्रम पाहता दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात नोंदल्या गेलेल्या या वक्तव्याची आठवण आल्यावाचून राहत नाही. वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील (नीट) पेपरफुटी व गैरप्रकारांवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर राजीनामा दिला आणि कॉक्रोच जनता पक्षानेही आंदोलन मागे घेतले. त्यामुळे गेल्या महिन्याभराहून अधिक काळ देशभरात घोंगावणारे एक वादळ शमले आहे.

आंदोलकांच्या अन्य मागण्या मान्य केल्या, तरी प्रधान यांचा राजीनामा घेणार नाही, असे 'सरकारी सूत्रे' छातीठोकपणे सांगत होती. मात्र, एका रात्रीत उलटफेर होऊन शनिवारी प्रधान यांनी राजीनामा दिला; किंबहुना हे प्रकरण केवळ 'प्रधान' यांच्यापुरते न राहता थेट पंत'प्रधानां'पर्यंत, म्हणजे संपूर्ण सरकारवरच शेकण्याची शक्यता दिसू लागल्याने त्यांना तो द्यावा लागला, असे म्हणणे योग्य ठरेल. यापूर्वी सुरेश प्रभू यांनी रेल्वे अपघाताची जबाबदारी घेऊन, एम. जे. अकबर यांनी 'मी टू' चळवळीतून झालेल्या आरोपांप्रकरणी आणि अकाली दलाच्या हरसिमरत कौर यांनी शेतकरी आंदोलनाप्रकरणी राजीनामे दिले होते. मात्र, खात्याशी संबंधित गैरप्रकाराची जबाबदारी घेऊन एखाद्या केंद्रीय मंत्र्याने राजीनामा देण्याची ही गेल्या बारा वर्षांतील पहिलीच वेळ.

पेपरफुटीचा प्रकार उघडकीस येताच प्रधान पायउतार झाले असते, तर एवढे महाभारत घडलेही नसते. मात्र, विद्यमान सत्तेच्या उतरंडीत तो निर्णय त्यांच्या हातात नव्हताच आणि कोणत्याही आरोपांपुढे झुकून राजीनामा देणे, हा या सरकारचा स्वभाव नाही. त्यामुळेच परीक्षा-फेरपरीक्षा आणि एकंदर गोंधळावरून विद्यार्थी-पालकांमध्ये नाराजी असताना, प्रधान आणि सरकारनेही यंत्रणेवर भार टाकून या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवण्याचे शक्यतोवर प्रयत्न केले. प्रश्नपत्रिकांच्या रचनाकारांचे कारनामे उघड होत असताना 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने (एनटीए) तर 'पेपरफुटी झालीच नाही,' असा संतापजनक पवित्रा घेतला.

या काळात भविष्यात संगणकाआधारित परीक्षा, पेपरफुटीला कडक शिक्षेचा कायदा, जलदगती न्यायालये आणि शिक्षण सचिवांच्या बदलीसह 'एनटीए'तील ४७ अधिकाऱ्यांचे निलंबन असे काही ठोस निर्णय केंद्र सरकारने घेतले खरे; पण त्यातून तरुणाईच्या रोषाला उतार पडला नाही आणि सारे प्रकरण प्रधान यांच्या राजीनाम्याभोवतीच केंद्रित झाले. त्यामुळेच या राजीनाम्याचे श्रेय विरोधी पक्ष, 'सीजेपी', उपोषणाला बसलेले सोनम वांगचुक यांच्याबरोबरच कोणतेही बलाढ्य संघटन किंवा अनुभवी नेता नसताना लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरलेल्या आणि समाजमाध्यमांतून सत्ताधाऱ्यांना हैराण करून सोडणाऱ्या तरुणाईला द्यावे लागेल. त्याबरोबरच दिल्लीमध्ये मुला-मुलींवर निर्दयी लाठीमार करून शांततेत सुरू झालेले आंदोलन अधिक भडकण्यास कारणीभूत ठरलेल्या दिल्ली पोलिसांनीही त्याला हातभार लावला, असे म्हणावे लागेल. आता सरकारने आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना मदत आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या मागण्याही मान्य करून वडिलकीची भूमिका घेतली, हे योग्य झाले.

या साऱ्या घटनाक्रमातून घेण्यासारखे अनेक धडे आहेत. कोणत्याही प्रश्नावर आपल्याला साजेसे-सोयीचे कथन रचणे, म्हणजेच 'नॅरेटिव्ह सेटिंग' तरुणाईच्या या आंदोलनात कामी येऊ शकले नाही. अर्थात, 'धर्मविरोधी', 'परदेशी निधी'सारखे आरोप या काळातही झाले; मात्र नव्या माध्यमतंत्रात वाकबगार आंदोलकांपुढे त्यांची मात्र चालली नाही आणि सत्ताधाऱ्यांच्या या हुकमी खेळपट्टीवर 'जेन झी'ने त्यांना हरवले. गुणाकाराच्या गतीने वाढता रोष आटोक्यात येत नसल्यानेच प्रधान यांच्या राजीनाम्यातून 'डॅमेज कंट्रोल' करण्यात आले आहे. नवे शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी या आघाड्यांवर काय पावले उचलणार, हे महत्त्वाचे आहे. मंत्रिमंडळ फेरबदलाच्याही चर्चा आहेत. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यात अधिकाधिक तरुणांना स्थान मिळण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात गदारोळात वाहून गेलेले संसदेतील कामकाज आता तरी सुरळीत सुरू होईल, अशी आशा आहे. तेथेही निर्विष संवाद व्हावा, हासुद्धा या आंदोलनातला आणखी एक धडा आहेच!

# ऑलिम्पिक पदक विजेत्या मीराबाई चानू : जिद्द, संघर्ष आणि यशाचा प्रेरणादायी प्रवास




ग्लासगो येथे सुरू आलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताची दिग्गज ऑलिम्पिक पदक विजेती सुवर्णकन्या मीराबाई चानू हिने इतिहास घडवला. स्पर्धेच्या चौथ्या दिवशी महिलांच्या ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदकाला गवसणी घातली. या विलक्षण कामगिरीसह तिने राष्ट्रकुल स्पर्धेमधील आपले सलग तिसरे सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम केला. अशी कामगिरी करणारी ती भारताची पहिलीच वेट लिफ्टर खेळाडू आहे. तिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे भारताचा तिरंगा पुन्हा एकदा डौलाने फडकला आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान आहे.

अर्थात अशी ऐतिहासिक कामगिरी करण्यासाठी वर्षानुवर्षे कठोर मेहनत, प्रचंड संयम आणि अविरत संघर्ष करावा लागतो. भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू ही अशाच संघर्षातून घडलेली प्रेरणादायी व्यक्ती आहे. तिचा प्रेरणादायी प्रवास हा केवळ एका खेळाडूचा नसून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वप्न पूर्ण करणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीसाठी प्रेरणादायी आहे.

मणिपूरमधील एका छोट्याशा आणि अतिशय सामान्य कुटुंबात ८ ऑगस्ट १९९४ रोजी मीराबाईचा जन्म झाला. घरची आर्थिक परिस्थिती बेताची होती. लहानपणापासूनच ती घरासाठी सरपण आणण्याचे काम करत असे. तिची शारीरिक ताकद पाहून कुटुंबीयांनाही तिच्यातील वेगळेपण जाणवले. त्याच काळात ऑलिम्पिक पदक विजेती कुंजाराणी देवी यांच्यापासून प्रेरणा घेऊन तिने वेटलिफ्टिंगमध्ये करिअर करण्याचा निर्धार केला.

सुरुवातीचा प्रवास मात्र अत्यंत खडतर होता. गावात योग्य प्रशिक्षणाची सुविधा नव्हती. लोखंडी बार नसल्यामुळे तिने बांबूच्या काठीवर सराव केला. प्रशिक्षणासाठी दररोज अनेक किलोमीटरचा प्रवास करावा लागे. पौष्टिक आहाराचीही कमतरता होती. तरीही या अडचणींनी तिची जिद्द कमी केली नाही. मेहनत, शिस्त आणि चिकाटी यांच्या जोरावर तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश मिळवण्यास सुरुवात केली.

२०१४ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत तिने रौप्यपदक, तर २०१७ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून जगाचे लक्ष वेधून घेतले. मात्र २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये अपेक्षाभंग झाला. स्पर्धेदरम्यान वजन उचलण्यात अपयश आल्याने तिला पदक मिळवता आले नाही. अनेक खेळाडू अशा अपयशानंतर खचून जातात; परंतु मीराबाईने या पराभवाला नव्या यशाची प्रेरणा बनवली. स्वतःच्या चुका सुधारल्या, अधिक मेहनत घेतली आणि पुन्हा नव्या जोमाने तयारीला लागली.

या अथक परिश्रमाचे फळ तिला टोकियो ऑलिम्पिकमध्ये मिळाले. महिलांच्या ४९ किलो गटात रौप्यपदक जिंकत तिने भारताच्या ऑलिम्पिक इतिहासात नवा अध्याय लिहिला. वेटलिफ्टिंगसारख्या ताकदीच्या खेळात भारतीय महिलाही जागतिक स्तरावर यश मिळवू शकतात, हे तिने सिद्ध करून दाखवले.

मीराबाई चानूची कहाणी आपल्याला शिकवते की, यशासाठी केवळ सुविधा पुरेशा नसतात; त्यासाठी ध्येयाप्रती निष्ठा, अपार मेहनत, आत्मविश्वास आणि संकटांशी लढण्याची तयारी आवश्यक असते. अपयश हा शेवट नसून तो यशाकडे नेणारा महत्त्वाचा टप्पा आहे, हे तिच्या जीवनातून स्पष्ट होते.

आज मीराबाई चानू ही केवळ भारताची यशस्वी वेटलिफ्टर नाही, तर लाखो तरुण-तरुणींसाठी प्रेरणेचा अखंड झरा आहे. तिचा संघर्ष सांगतो की, स्वप्ने मोठी असतील, मेहनत प्रामाणिक असेल आणि जिद्द अढळ असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नसते. भारताला तिच्यासारख्या खेळाडूंचा अभिमान आहे आणि तिची यशोगाथा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५३६२९५

# विकसित प्रभाग ही ओळख कायम ठेवण्यामध्ये उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे यांना यश



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या पूर्व भागातील मोक्याचा आणि विकसित प्रभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रभाग क्रमांक चार मधील जिजाऊ रेसिडेन्सी मधील रस्त्यावरील चिखल दलदलीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली लावण्यामध्ये मोहोळ नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष तथा या प्रभागाचे नगरसेवक दत्तात्रयअण्णा खवळे यांना यश मिळाले आहे.

या पुढील काळातही उर्वरित रस्ते, पाणी, गटार इत्यादी विविध मूलभूत सुविधांचे प्रश्न माजी नगरसेवक मुस्ताक शेख यांच्या सहकार्याने सोडविण्यासाठी मी वचनबद्ध असल्याचे यावेळी उपनगराध्यक्ष दत्तात्रय अण्णा खवळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

दैनंदिन प्रभाग भेटी दरम्यान यापुर्वी उपनगराध्यक्ष खवळे यांना येथील नागरिकांनी रस्ते आणि गटाराचा प्रश्न सोडवण्याबाबतची विनंती केली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सरकार परिषदेचे अध्यक्ष ना.राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार यशवंत माने यांच्या मार्गदर्शनाखालील निधीतून उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे यांच्या प्रयत्नातून जिजाऊ रेसिडेन्सी मधील अद्यावत गटार आणि दर्जेदार स्वरूपाचा डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.



२०१६ मध्ये झालेल्या नगर परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये प्रभागातील मतदार बंधू भगिनींना विकासकामांचे दिलेले आश्वासन आणि नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणूकीमध्ये पुनश्च विजयी झाल्यानंतर विकास कामे पूर्ण करण्याची जबाबदारी वाढली. नगरसेवक हा खऱ्या अर्थाने जनतेचा सेवक असतो. त्यामुळे आमच्या या प्रभागातील दलदल कायमस्वरूपी हटवायची हे ध्येय ठेवून वरिष्ठ स्तरावरून निधी मिळवून अद्यावत गटार आणि दर्जेदार रस्त्याचे काम पूर्ण करून दाखवल्याचे मनस्वी समाधान वाटत आहे. केवळ विकासकामे करायची नाही तर ती दर्जेदारच करण्याची आमची कार्यपद्धती आहे. म्हणून पुन्हा प्रभाग क्रमांक चारच्या जनतेने मला आणि माजी नगरसेवक मुस्ताक शेख यांच्या सुविद्य पत्नी शाहिस्तापरवीन मुस्ताक शेख यांना भरभरून मताधिक्य देत पुन्हा सेवा करण्याची जी संधी दिली त्या संधीचे सोने केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

**- दत्तात्रय खवळे,** उपनगराध्यक्ष मोहोळ नगरपरिषद

# इच्छा भगवंताची परिवाराच्या 'भाऊ चषका'चा दिमाखदार समारोप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्थांकडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्र. २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विजापूर रोड येथील शासकीय क्रीडांगणावर २२ ते २५ जुलैदरम्यान आयोजित 'भाऊ चषक' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी व शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. इच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली, माजी नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड यांच्या मार्गदर्शनात युवा नेते चेतन नागेश गायकवाड, कार्तिक जाधव, अजिंक्य अनिल जाधव आणि प्रेम नागेश गायकवाड यांनी स्पर्धेचे अत्यंत शिस्तबद्ध व दर्जेदार नियोजन केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत कार्तिक जाधव व चेतन जाधव यांनी केले. यावेळी भाजपा शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, नगरसेविका संगीताताई जाधव, माजी महिला बालकल्याण समिती सभापती अश्विनीताई चव्हाण, चैत्रालीताई गायकवाड, कल्पनाताई कदम, नगरसेवक तथा मंडई व उद्यान समिती सभापती राजशेखर पाटील, अक्षय अंजिखाने, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, अक्षय वाकसे, टकारी समाज युवक अध्यक्ष विनोद गायकवाड, श्रीकांत गिड्डे, यशवंत पाथरुट, संगमेश्वर बगले, राधिका परब, दिपाली हटकर आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत ग्रामीण व शहरी भागातील १६ संघांनी सहभाग घेतला. धावते समालोचक पवार आणि डान्सिंग अंपायर म्हणून प्रसिद्ध सोन्या बापू भोसले हे स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. अंतिम सामने चुरशीचे झाले. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी स्वतः मैदानात बॅटिंग करत खेळाडूंचे मनोबल वाढविले. यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी म्हणाले, ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून अशा स्पर्धांमधून राज्याला दर्जेदार क्रिकेटपटू घडतील. तर आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, क्रीडा युवकांमध्ये शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित करते. किसन भाऊ जाधव व इच्छा भगवंताची परिवाराने राबविलेला हा उपक्रम प्रेरणादायी आहे स्पर्धेत SP 11 संघाने विजेतेपद पटकावले, KK राजहंस (उळे) उपविजेता ठरला, तर KK राजा संघाने तृतीय क्रमांक मिळविला. विजयवीर वडाळा याला मॅन ऑफ द टूर्नामेंट व बेस्ट बॅट्समन, तर मजीद शेख यांना बेस्ट बॉलर पुरस्कार देण्यात आला. प्रथम क्रमांकासाठी ४६ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २३ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये रोख पारितोषिक व चषक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

पान १ वरून

## भेसळयुक्त अन्नपदार्थांचा आता...

पाण्याचा विसर्ग उद्यापर्यंत पंढरपूर मध्ये पोहोचणार असून चंद्रभागेचे वाळवंट पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नदीकाठी स्पीकर वरून चंद्रभागेत न जाण्याच्या सूचना देण्यास सुरुवात केली आहे.

वारकरी आणि भाविकांना रात्री तसेच पहाटे नदीपात्रात जाणे टाळावे, जिल्हाधिकाऱ्यांचं आवाहन

सोलापूर जिल्ह्याची वरददायीनी म्हणून ओळख असलेले उजनी धरणात सध्या मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा होतोय. धरण 100 टक्के भरण्याकडे वाटचाल करतं असताना प्रशासनाने खबरदारी म्हणून पाण्याचा विसर्ग सुरु केला आहे. उजनी धरणातून सध्या 30 हजार क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. रात्री 8.30 वाजल्यानंतर विसर्ग वाढवून 30 हजार क्यूसेक इतका करण्यात आला आहे. त्यामुळे भीमा (चंद्रभागा) नदीची पातळी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी वारकरी आणि भाविकांना रात्री तसेच पहाटे नदीपात्रात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. प्रक्षाळपूजेपर्यंत पंढरपुरात भाविकांची मोठी गर्दी राहणार असल्याने प्रशासनाने सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

पुणे परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे उजनी धरण 98 टक्के भरले असून धरणातून भीमा नदीत पंचवीस हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. अजूनही उजनी धरणात तब्बल 65 हजार क्युसिक विसगार्ने पाणी जमा होत असल्याने भीमा नदीत सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. यामुळे प्रशासनाने नदीकाठच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा दिलेला आहे. विशेषतः पंढरपूर मध्ये अजूनही आषाढी यात्रेला आलेल्या भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी असून हे भाविक चंद्रभागा स्नानासाठी जात असल्याने प्रशासनाची काळजी वाढली आहे.

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या...

येवती (८३.७३ टक्के) आणि अंकोली केंद्राअंतर्गत औंधी (८२ टक्के) या आयुष्मान आरोग्य मंदिरांनी यश मिळवले आहे.

या मानांकनामुळे उपकेंद्र स्तरावर संसर्गमुक्त उपचार, औषधे व उपकरणांचे योग्य व्यवस्थापन आणि रुग्ण समाधानात वाढ होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मानांकन प्राप्त संस्थांना राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत विशेष प्रोत्साहन निधी मिळणार आहे. या निधीतून आरोग्य केंद्रांमध्ये आधुनिक उपकरणे आणि पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या जातील. यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना चांगल्या उपचारांसाठी शहरात न धावता गावातच विश्वासार्ह सुविधांचा लाभ घेता येईल.

पालकमंत्री जयकुमार गोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन व आरोग्य सभापती चैतन्यसिंह केदार सावंत यांच्या नियंत्रणाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहायक संचालक डॉ. मोहन शेगर, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे मिळाले आहे.

## एआय तंत्रज्ञानाचा वापर करून...

**क्रॉस-कॅमेरा ट्रॅकिंग व पुनर्प्रवेश पडताळणी:**

वारकरी शहरात फिरताना इतर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी त्यांना न मोजता एकाच ओळखीने ट्रॅक केले. तसेच शहराबाहेर जाऊन पुन्हा प्रवेश करणाऱ्या भाविकांची जुन्या नोंदीशी पडताळणी करून दुबार मोजणी रोखण्यात आली.

**नागरिकांच्या गोपनीयतेचे तंतोतंत पालन**

या मोजणीदरम्यान भाविकांच्या गोपनीयतेची पूर्ण दक्षता घेण्यात आली. भारताचा *'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट' (डीपीडीपी) आणि जीडीपीआर नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यात आले असून, कोणत्याही व्यक्तीचा फोटो किंवा वैयक्तिक माहिती सर्व्हरवर सेव्ह करण्यात आलेली नाही.

"पंढरपूर आषाढी वारी हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक सोहळ्यांपैकी एक आहे. लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि योग्य नियोजनासाठी गर्दीचा अचूक अंदाज असणे अत्यंत आवश्यक असते. पारंपरिक पद्धतींमधील त्रुटी दूर करून यंदा सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सुमारे 32 लाख युनिक भाविकांची अचूक नोंद केली आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा भविष्यातील गर्दी व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होईल. असे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

# अकलूजच्या अकलाई देवी मंदिर परिसरात स्वच्छता व साफसफाईचा उपक्रम

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज गावची ग्रामदैवत श्री अकलाई देवीची यात्रा (भंडारा) दि.३१ जुलै रोजी येत असून मंदिर व मंदिर परिसराची स्वच्छता व साफसफाई करण्याचे काम अकलूजमधील सामाजिक संघटना व विविध मंडळाचे सदस्य एकत्र येवून करीत असतात.गेली ४२ वर्षापासून ही सेवा करत आहेत.याचे नियोजन अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील करीत असतात.

आषाढी एकादशी झाल्यानंतर येणा-या पहिल्या मंगळावर किंवा शुक्रवार या दिवशी अकलाई देवीची यात्रा संपन्न होत असते.त्यापुर्वी अकलूजमधील लोकमान्य गणेश मंडळ,साईबाबा सेवा ट्रस्ट, शिवरत्न गणेश मंडळ,अकलाई देवी भक्त मंडळ,आरती मंडळ, बुरूज समाज, लिंगायत समाज, अकलाई देवीचे पुजारी गुरव परिवार,वडर समाज, हातगाडी संघटना व इतर समाजातील लोकांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत असतो. मंदिराच्या शिखरापासून मंदिर परिसर व देवीच्या गाभारा स्वच्छ व निर्मळ केला जातो.पुर्वीच्या काळी अकलूज ग्रामपंचायतीच्या पाण्याच्या टॅकरने मंदिर धुण्यासाठी पाणी वापरले जात होते पण सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामार्फत अत्याधुनिक पाणी फवारण्याच्या यंत्रामुळे दोन तीन कार्यकर्ते हे पाणी फवारण्याचे काम होवू लागले आहे.तर जेष्ठ नागरिकांनी मंदिरातील पुजेची भांडी घासून स्वच्छ करण्यात आले आहे. यावेळी तात्या गुळवे, विठ्ठल गायकवाड, ॲड.राजेंद्र आर्वे, उमेश शेटे, अरूण राऊत, गंगाधर देवकाते, दिपक शिंदे, उदय शेटे, पिंटू वैद्य, विजय टोंगळे, मोहन गुरव,मदन गुरव, अभिषेक गुरव, अक्षय गुरव, अनिरुद्ध गुरव महेश सुर्यवंशी, बाळासाहेब रिसवडकर, आप्पा आवताडे उपस्थित होते.



दरवर्षी अकलाई देवीच्या यात्रेच्या पुर्वी मंदिर व मंदिर परिसर स्वच्छ व साफसफाई करण्याचे काम अकलूजमधील विविध मंडळातील सदस्य,सामाजिक संघटनेतील युवा कार्यकर्ते व जेष्ठ नागरिक सहभागी होवून करीत असतात.हे काम गेली ४२ वर्षापासून सुरू असून या उपक्रमात तरूण वर्गाने सहभागी होवून सेवा करावी.यात सेवा करणारे अनेक जण वयोवृद्ध झाले.या उपक्रमात तरूणांचा सहभागात वाढ होण्याची अवश्यकता आहे.

**किशोरसिंह माने-पाटील,** माजी सरपंच अकलूज ग्रामपंचायत अकलूज

# ड्रग इन्स्पेक्टर पेपरफुटीची स्वतंत्र चौकशी करा; आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे रोहित पवार यांची मागणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** औषध निरीक्षक (ड्रग इन्स्पेक्टर) पदाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि कालबद्ध चौकशी करण्यात यावी, अशी ठाम मागणी आ. रोहित पवार यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे केली. यावेळी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांनी आयुक्तांची भेट घेऊन या संपूर्ण प्रकरणावर सविस्तर चर्चा केली आणि निवेदन सादर केले.

आ.रोहित पवार यांनी सांगितले की, ड्रग इन्स्पेक्टर भरती प्रक्रियेबाबत अनेक गंभीर शंका उपस्थित होत असून, या पेपरफुटीमुळे प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि निश्चित कालमयार्देत चौकशी होणे अत्यावश्यक आहे.



यावेळी विद्यार्थ्यांनीही परीक्षेतील गैरव्यवहाराची माहिती आयुक्तांसमोर मांडत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

बैठकीदरम्यान आयुक्त तुकाराम मुंढे यांनी विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. हा विषय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अखत्यारित येत असल्याने या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे आयोगाकडे सुपूर्द करण्यात येतील आणि आयोग याबाबत योग्य ती कार्यवाही करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केल्याची माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली.

आ.रोहित पवार यांनी स्पष्ट केले की, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, हीच भूमिका असून, या प्रकरणातील सत्य बाहेर येण्यासाठी आणि दोषींना शिक्षा होण्यासाठी ते विद्यार्थ्यांसोबत ठामपणे उभे राहतील. राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ड्रग इन्स्पेक्टर पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्हे उपस्थित झाले असून, आता टढरउ या प्रकरणात कोणती भूमिका घेते आणि पुढील कार्यवाही काय होते, याकडे विद्यार्थ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## वात्रटिका

### गणित पावसाचे

कधीच वाटले नाही की
गणित त्यांचे जुळते...
मुसळधार सांगतात ते
तेव्हा तुषार सिंचन होते...
ढगांची गर्दी अशी होते
की वाटते बरसून जाईल...
जणू आश्वासनांची खैरात
होते नि नेता विसरून जाईल...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# आषाढी वारीत आ. रोहित पवारांच्या पुढाकाराने एक लाख छत्र्यांचे वाटप - डॉ.योगेश रणदिवे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांच्या माध्यमातून दर्शनासाठी आलेल्या वारकऱ्यांसह यात्रेच्या बंदोबस्तासाठी दिवस-रात्र कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी, छोटे व्यावसायिक, दिव्यांग नागरिक, आरोग्य सेवक आणि परिचारिका यांना उन्हाचा तडाखा व पावसाच्या सरींपासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर छत्र्यांचे वाटप करण्यात आले अशी माहिती डॉक्टर योगेश रणदिवे यांनी दिली.



आषाढी वारीत लाखो भाविकांच्या सेवेसाठी अनेक यंत्रणा अहोरात्र कार्यरत असतात. ऊन वारा पाऊस यापासून संरक्षण करण्या करता एक लाख छत्र्यांचे वाटप करण्यात आले समाजामध्ये अशा प्रत्येक घटकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना प्रत्यक्ष उपयोगी पडेल अशी मदत करण्याच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचे नियोजन डॉ. योगेश रणदिवे व शहराध्यक्ष दीपकदादा वाडदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष अमरसिंह खांडेकर सर, आसिफ पटेल, दिनेश ममाने तसेच स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पंढरपूर शहरातील विविध ठिकाणी जाऊन लाभार्थ्यांना छत्र्यांचे वाटप केले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेचे वारकरी दिंडी उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

प्रथम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते श्री पांडुरंगाच्या प्रतिमेचे व पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषात दिंडीने मार्गक्रमण सुरू केले. या भव्य दिंडीत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या ११४५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान केले होते. विठ्ठलाच्या वेशभूषेत शिवराज घंटे तर रखुमाईच्या भूमिकेत प्रणिता ममदापुरे, संत ज्ञानेश्वरांच्या वेशभूषेत युवराज



घंटे, संत तुकारामांच्या वेशभूषेत शाश्वत मठपती आदी विद्यार्थ्यांनी सजीव देखाव्यातील पोशाखात आकर्षित दिसत होते.

संगीत विभागाच्या स्वराली रॅका, पूर्वा रेके, वैष्णवी घंटे, रक्षिता सुंकनपल्ली, हेमा जुंजा, लहरीका गोने, प्रचिता श्रावण, गणेश चपळगाव, भरत गडगी, समर्थ आलदी, मल्लिकार्जुन खानापुरे आदी विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाची शाळा भरली, चंद्रभागेच्या तिरी, विठू माऊली तू माऊली जगाची, अबिर गुलाल, हरी ओम विठ्ठला आदी विविध प्रकारचे भक्तिगीते सादर केली.विद्यार्थिनींनी माऊली माऊली या गीतावर सादर केलेले नृत्य सादर केले.

हि दिंडी निलम नगर, सुनील नगर, विनायक नगर, माळी नगर आणि आशा नगर या परिसरातून काढण्यात आली. ठिकठिकाणी भक्तगण पालखीचे औक्षण करुन दर्शन घेत होते. भक्तगण ठिकठिकाणी पाणी व प्रसाद वाटप करुन दिंडीचे स्वागत केले. बोला पुंडलिक वरदा श्री ज्ञानदेव.. तुकाराम.. पंढरीनाथ महाराज की जय या जयघोषानी तसेच टाळ-मृदंगाचा निनादांनी परिसर दुमदुमून गेला होता. भगवे झेंडे धारी विद्यार्थ्यांमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगून गेला होता. शाळेच्या प्रांगणात पारंपरिक रिंगण, फुगडी, काटवटकणा यांसारख्या खेळांचे सादरीकरण करण्यात आले.

या दिंडीत महाराष्ट्र शासनाच्या 'नवभारत साक्षरता अभियान' अंतर्गत 'वारी साक्षरतेची' या उपक्रमाचाही जनजागृती करण्यात आली.

या भक्तिमय दिंडीत मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतले.

# राजवी ॲग्रो पॉवरचा गळीत हंगाम 2026-27 चा रोलर पूजन सोहळा संपन्न

**माढा (कटूसत्य वृत्त):-** राजवी ॲग्रो पॉवर प्रा.लि. आलेगाव बु., ता. माढा, जि. सोलापूर येथे गळीत हंगाम 2026-27 च्या शुभारंभानिमित्त रोलर पूजन सोहळा संपन्न झाला.

कारखान्याचे व्हाईस चेअरमन,जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज सावंत यांच्या शुभहस्ते रोलरचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव सावंत होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष शिवाजीराव सावंत म्हणाले,



"शेतकऱ्यांनी दर्जेदार ऊस दिल्यास कारखान्याला चांगले गाळप करता येते आणि त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांनाच होतो. त्यामुळे सर्वांनी वेळेत तोडणी-वाहतूक करून दर्जेदार ऊस द्यावा. आपल्या एकजुटीतूनच हा हंगाम यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी कारखान्याचे ज्येष्ठ संचालक कालिदास सावंत, ऋतुराज सावंत,सूर्यकांत शेंडगे, तानाजी गाडे, भजनदास खटके, जब्बार महाजन, अरविंद खरात, भारत गायकवाड, विठ्ठल काळे,अनील पाटील,राजाभाऊ खटके, शहाजी पाडुळे, सचिन भुसारे, राहुल खटके, गणेश धाईंजे, सुमित साळुंखे, प्रविण बर्गे यांच्यासह शेतकरी, वाहन मालक,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राजाभाऊ खटके यांनी मानले.

# विठुरायाच्या पंढरीत आयुर्वेदिक उपचार पद्धतीने केल्या गेली आरोग्यदायी सेवा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।। विठुरायाच्या चरणी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव नतमस्तक होऊन सर्वांना चांगल आयुष्य, आरोग्य लाभो आणि बळीराजासाठी चांगला पाऊस पडू दे... सर्वांना निरोगी आरोग्यदायी जिवन मिळु दे ... असं साकडं विठूराया चरणी घातलं.

आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक व वारकरी दिंडया श्री.क्षेत्र पंढरपूर येथे जाऊ विठूराया चरणी नतमस्तक होतात. डोळ्याचं पारणं फेडणाऱ्या भक्तीमय सोहळ्यासाठी राज्यातील काना कोपऱ्यातुन लाखो वारकरी विठ्ठल नगरीत विठ्ठला चरणी नतमस्तक होण्यासाठी एकवटतात. आषाढी एकादशी निमित्त केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी श्री.पांडुरंगाचे मनोभावे दर्शन घेतले. देशातील प्रत्येक नागरिकांना चांगले निरोगी आयुष्य मिळूदे... अन्नधान्य पुरवणाऱ्या बळीराजासाठी दमदार पाऊस होऊ दे ...असे साकडेही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी विठुराया चरणी घातले.





**केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची विठूराया चरणी सलग 43 वी वारी**

देशाचे केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव हे विठुरायाचे परमभक्त आहेत. कोरोनाचा दोन वषार्चा कार्यकाळ सोडला तर गेल्या 43 वर्षापासून ते आषाढी एकादशीला नियमितपणे विठू चरणी नतमस्तक होण्यासाठी जात असतात..प्रत्येक भारतीयांना निरोगी आयुष्य लाभु दे... बळीराजाला सुखी ठेव... चांगला पाऊस पडू दे.. असं साकड त्यांनी आपली 43 वी वारी पूर्ण करताना विठ्ठल चरणी घातलं...

**विठुरायाच्या पंढरीत आयुर्वेदिक उपचार पद्धतीने केल्या जातेयं वारकऱ्यांची सेवा..**

आषाढी एकदशी निमित्य विठ्ठल रुखमाईच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आलेल्या वारकऱ्यांना आयुष सेवा सुविधा केद्रामार्फत पारंपरिक आयुर्वेदिक उपचार पद्धतीने आरोग्यदायी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यावर्षी पंढरपुर येथील तिन रस्ता येथे महाआरोग्य शिबीर, चंद्रभागेच्यातिरी आरोग्य केंद्र वाळवंट आणि आरोग्य केंद्र 65 एक्कर या तिन ठिकाणावर ही केंद्र उभारण्यात आले आहे या आयुष सेवा सुविधा केंद्रावर वारकऱ्यांना आयुवैदीक, होमिओपॅथी औषध वाटप, योगाबाबत मार्गदर्शन, स्नेहन - स्वेदन (वाफ देणे) वारकऱ्यांसाठी तेल - मसाज, विद्ध - कर्म, अग्नी - कर्म, चरण सेवा करण्यात येत आहे.

# सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक
## सिंहगडच्या विद्यार्थ्याला सुवर्णपदक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव-सोलापूर येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाचा विद्यार्थी बोड्डू आदित्य अशोक याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अभियांत्रिकी पदवी (बी.ई.) परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

अभियांत्रिकी विद्याशाखेत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्याला विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर सुवर्णपदक जाहीर झाले आहे. आदित्यने 9.99 सीजीपीए तसेच ८9.48 टक्के गुण मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव-सोलापूर कॅम्पसचे संचालक संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले तसेच उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, विभाग प्रमुख प्रा. एच टी गुरमे यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून त्याच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळेस प्रा. आय जी शेख, प्रा. सुरज धनवे, प्रा. सुनील शाखापुरे, प्रा. शैलेजा शेळके, प्रा. अमृता रुईकर, प्रा. विनायक पालमूर, प्रा. आम्रपाली गुंड, एल सी मैंदर्गी, विनायक नाळे, जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयाच्या या यशामुळे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवी उंची मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.


**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि/४७८/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साो, यांचे कोर्टात**

अतुल अरुण नामदे, वय-३१ वर्षे, धंदा-शेती, रा. पाटकुल, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि.सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक पाटकुल, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी). } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार याचा अतुल अरुण नामदे याचा जन्म ता.२१/०४/१९९५ रोजी अर्जदार यांची आई सुंदरा अरुण नामदे हिचे पोटी मौजे पाटकुल, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे घरी झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.१५/०७/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील एप्रिल १९९५ चे अभिलेखात अर्जदार यांचा अतुल अरुण नामदे याचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१०/०८/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. २३/०७/२०२६

(शिक्का) **हुकूमावरुन**
**मा.तहसिलदार सो, मोहोळ**

**जाहीर प्रसिध्दीकरण** क्र/अभिलेख/कावि/४७७/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साो, यांचे कोर्टात**

श्री. समर्थ दिपक नामदे, वय-२१ वर्षे,धंदा-शिक्षण, रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि.सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक पाटकुल, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी). } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे आज्जी मंगला अरुण नामदे हिचा मृत्यू दि.२५/०५/१९९३ रोजी मौजे पाटकुल, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथेझालेले आहेत. तरी, त्यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे होऊन, तसा मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांनी त्यांची आज्जी मंगला अरुण नामदे यांचा मृत्यू दाखला देण्यास कोणाचीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी मे. कोर्टाने नेमलेली पुढील दि. १०/०८/२०२६ रोजी अथवा त्यापुर्वी स्वतः अगर वकीलामार्फत लेखी म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर पुढील योग्य ते हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर प्रसिध्दिीकरण सही शिक्कयानिशी दिले असे ता. २३/०७/२०२६

(शिक्का) **हुकूमावरुन**
**मा.तहसिलदार सो, मोहोळ**


# महाज्योती आणि वनार्टीतील कोट्यवधींच्या निविदांची चौकशी करा : रोहन सुरवसे-पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) तसेच वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) येथील कथित आर्थिक गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करून अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी नेते रोहन सुरवसे पाटील यांनी महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात महाज्योतीचे वित्त व लेखा अधिकारी तथा वनार्टीचे प्रभारी संचालक प्रशांत वावगे आणि महाज्योतीचे निविदा सल्लागार चंदनसिंग यांच्या कार्यकाळात कोट्यवधींच्या निविदांमध्ये अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची स्वतंत्र महाज्योती उच्चस्तरीय समिती किंवा सक्षम तपास यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनानुसार, प्रशांत वावगे हे महाज्योतीमध्ये पाच वर्षांहून अधिक काळ कार्यरत असून त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच तत्कालीन व्यवस्थापकीय



संचालकांच्या बदलीनंतर प्रभारी व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कार्यकाळात कोट्यवधींच्या निविदा मंजूर झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या सर्व निविदांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सुरवसे पाटील यांनी प्रशांत वावगे यांना महाज्योती व वनार्टीतील सर्व पदांवरून तात्काळ दूर करणे, चंदनसिंग यांची निविदा सल्लागार म्हणून नियुक्ती रद्द करणे, त्यांच्या कार्यकाळातील निविदांची चौकशी करणे, दोषी आढळल्यास फौजदारी व विभागीय कारवाई करणे, शासनाच्या आर्थिक हिताचे संरक्षण सर्व करण्यासाठी आवश्यक पावले उचलणे तसेच चंदनसिंग यांच्याशी संबंधित संस्थांना काळ्या यादीत टाकून सुरू असलेल्या निविदा प्रक्रियेतून वगळण्याची मागणी केली आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **USHA NAGANATH SALUNKHE** To **USHA BHIMRAO MALI** for passport issuance as per document.

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) डोळे, नयन २) काव्य, कविता ३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा ४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा १२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी १७) समुद्राच्या पाण्याची चव १८) बसपाचे निवडणूक चिन्ह १९) वभ उलट लिहा २०) जंगलातील प्राण्यांचा राजा २१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत ३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ ३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा ३५) जुनाच्या विरूध्दार्थी ३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या ३७) लोखंडी आकडा, हुक ३९) शहर ४१) मास, महिना ४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक ४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह ४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते ८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत) ११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका १४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या १५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव १७) एक म्हण-** तशी माती १८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज २१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य २३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय २८) सूर्योदयापूर्वीचा उष:काल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य ३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा ३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक ३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत) ४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु - 14

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | | 2 | 7 | | 5 | 8 |
| 2 | | | 6 | 8 | | | 1 | |
| | 7 | | | | 5 | 4 | | 2 |
| | | 7 | | 3 | | | | 5 |
| | | 6 | | 9 | 8 | | | |
| 5 | | 3 | 7 | 6 | 4 | | | 9 |
| | 5 | | | | | 2 | 9 | |
| 7 | 6 | 2 | | | 9 | | 8 | |
| 8 | 1 | | | 5 | 6 | 7 | | |

# ‘अक्कलकोट 10K भक्ती रनला’ उत्स्फूर्त प्रतिसाद; हजारहून अधिक धावपटूंचा सहभाग

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट 10K भक्ती रन २०२६ स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या रविवारी सकाळच्या प्रहरी पार पडली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा आदि राज्यातून आलेल्या हजारहून अधिक धावपटूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. अपंग धावपटूचां देखील समावेश होता. श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! व हलग्यांच्या निनादात ‘भक्ती रन’ स्पर्धेचा शुभारंभ न भुतोनी संपन्न झाला.

या ‘आरोग्य ते अध्यात्म’हा प्रेरणादायी संदेश देणारी ही ’ भक्ती रन’ स्पर्धा अक्कलकोटच्या पावन भूमीत संपन्न झाली. धावपटूनां शारीरिक तंदुरुस्ती, अध्यात्मिक उन्नती आणि भक्तीमय वातावरणाचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला आहे.

प्रारंभी या स्पर्धेचे उद्घाटन व ध्वजप्रदान ख्यातनाम अभिनेते भरत जाधव, मयूर पाटील, श्री वटवृक्ष स्वामी महराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पन्हाळकर, आणि चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूरचे अतिश शहा, चंद्रशेखर गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धा ए.आय.एम.एस. (आंतरराष्ट्रीय मॅराथॉन आणि दीर्घ-अंतर शर्यतींची संघटना) प्रमाणित मार्गावर आयोजित करण्यात आली होती. मार्गावर धावपटूंना प्रेरणा मिळावी यासाठी पंचमहाभूत (पृथ्वी,जल,अग्नी,वायू आणि आकाश) या संकल्पनेवर आधारित प्रेरणादायी पोस्टर्स लावण्यात आले होते. उत्कृष्ट हायड्रेशन, वैद्यकीय मदत, फिजिओ, स्वयंसेवक आणि शिस्तबद्ध रेस व्यवस्थापनामुळे स्पर्धेचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, तसेच त्यांच्या मित्रपरिवाराने स्वतः धावून सहभागी होत नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रेरणादायी संदेश दिला.

स्पर्धेतील विजेत्यांचा न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, खजिनदार लाल राठोड, मनोज निकम, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, प्रथमेश इंगळे, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले,



कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, कु. समर्थ संदीप फुगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**पुरुष गट (१६-३० वर्षे)**

* प्रथम : चैतन्य रुपनर
* द्वितीय : अभिनंदन सूर्यवंशी
* तृतीय : अंकुश हक्के

**महिला गट (१६-३० वर्षे)**

* प्रथम : ज्योती बन्ने
* द्वितीय : मोनिका वाळके
* तृतीय : भक्ती मगदूम

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट, चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, पोलीस प्रशासन, अमोलराजे मित्र मंडळ व लेझीम संघ, आरोग्य विभाग, वैद्यकीय पथक, स्वयंसेवक, प्रायोजक आणि धनराज भुजबळ यांचे स्वयंसेवक व स्पर्धक सर्व सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचे आयोजकांनी आभार मानले. या प्रसंगी प्रशांत आरबाळे, महेंद्र दुर्गावले, मुंबई, सोनाली ढवरे, बारामती, मनोज चिपळूणकर, धनराज भुजबळ, कु.परी प्रवीण देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जनार्धन मानमंडे रा. रायगड, या स्पर्धकाला न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी गडांच्या पाहणी करिता रु. ११ हजार ची देणगी दिली.

दरम्यान या भव्य ‘अक्कलकोट 10K भक्ती रन’ या आगळ्यावेगळ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंकचे उद्घाटन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले होते. मॅरॅथॉनच्या अधिकृत ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेला प्रारंभ करत रजिस्ट्रेशन लिंकचे लोकार्पण करण्यात आले होते. राज्यभरातील धावपटूंना या भव्य ‘भक्ती रन’मध्ये सहभागी होण्यासाठी अधिकृतपणे नोंदणी करता आली. यामध्ये ३ कि.मी., ५ कि.मी. आणि १० कि.मी. अशा विविध गटांमध्ये सहभागी धावपटूंना बिब, टी-शर्ट, मेडल, प्रमाणपत्र, आकर्षक बक्षिसे, मेडिकल सपोर्ट, पौष्टिक नाश्ता तसेच उत्साहपूर्ण वातावरणाचा अनुभव मिळाला. भक्ती, फिटनेस आणि पारंपरिक संस्कृतीचा संगम घडवणारा हा उपक्रम राज्यभरातील धावपटू, क्रीडाप्रेमी आणि स्वामी भक्तांसाठी एक विशेष पर्वणी ठरला. धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडाक्षेत्रास देखील महत्व देऊन कार्यरत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडाक्षेत्रास देखील महत्व देऊन कार्यरत आहे.

म्हणूनच अक्कलकोट १०कि.मी. भक्ती रन- २०२६ चे आयोजन करण्यात आलेले होते. उत्तर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून व क्रीडा विभागाकडून या स्पर्धेला सहकार्य लाभले. स्पर्धेच्या अगोदर झुंबा व हलगी नृत्य संपन्न झाले. त्या नंतर स्पर्धेला सुरुवात झाली.

या प्रसंगी अतिश पवार यांच्या वाढदिवसानिमित्य या कार्यक्रमात सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमास न्यासाचे विश्वस्त संतोष भोसले, रोहित खोबरे, प्रवीण देशमुख, शीतल फुटाणे, प्रवीण घाटगे, निखील पाटील, गोटू माने, सिद्धेश्वर मोरे, सुमित घाटगे, शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, मल्लिकार्जुन मजगे, अश्पाक काझी, सर्फराज शेख, रमेश हळसंगी, महांतेश स्वामी, असद फुलारी, संतोष माने, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, बालाजी पाटील, आकाश शिंदे, सागर शिंदे, माजी नगरसेवक रामचंद्र समाणे, प्रकाश सोनटक्के, गणेश सोनटक्के, हेमंत कल्याणशेट्टी, विश्वजित पाटील, धनंजय गडदे, नारायण गडदे, श्रीशैल रोडगे, अप्पू कलशेट्टी, सुमित कल्याणी, रोहित पाटील, डॉ. विपुल शहा, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. बसवराज चिनकेकर, डॉ. रुपाली जोशी, शिरीष जनार्धन, अंकित गर्ग, ऋत्विक डांगे, प्रदीप माने, डॉ. पवित्रा मलगोंडा, डॉ. सिद्धेश्वर मलगोंडा, डॉ. विनायक बुदले, डॉ. मंजुषा मेंथे, डॉ. सचिन सांगोळगी, डॉ. प्रशांत वाली, मल्लिनाथ मसुती, अप्पी उंबराणीकर, विश्वनाथ देवरमणी, माणिकराव बिराजदार, प्रा. प्रकाश सुरवसे, डॉ. अर्जुन त्रीगोळे, डॉ. अर्जुन मुकुटराव, डॉ. अनिल उडचाण, लगमना माळी, शिशिर जन्नाराम, वैशाली जाधव, जयंत शिंदे, प्रशांत माने, प्रशांत साठे, योगेश पवार, अमर मसरे, रोहित मोरे, शुभम सावंत, ज्ञानेश्वर भोसले, राजाराम पवार, किरण पाटील, किरण साठे, विनायक भोसले, आकाश सूर्यवंशी, समर्थ घाटगे, भरत राजेगावकर, सायबण्णा जाधव, स्वामिनाथ बाबर, फहीम पिरजादे, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, विलास राठोड, मेजर किरण जाधव, राहुल भंडारे, राहुल इंडे, आकाश कवडे, रोहन खवाटे, दादासाहेब सपकाळे, अमृत खेडकर, हेमंत वाघमारे, दत्तात्रय काळे, आरती शहा, मनोज गायकवाड, स्वनिल शहा, तृप्ती शहा, अनुप शहा, अनघा शहा यांच्या सह राज्य, परराज्यातील धावपटू बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे देखील सत्कार करण्यात आला. यावेळी धावपटू करिता फिजीओथेरेपी व वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले होते. स्पर्धकांनी दरवर्षी श्री क्षेत्र अक्कलकोटला भक्ती रन स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी आयोजकाकडे केली. अन्नछत्र मंडळ व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांनी उत्कृष्ट रित्या केलेल्या नियोजनाचे स्पर्धकाकडून कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्थाविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर आभार अतिश शहा यांनी मानले.

# बार्शी तालुका माजी सैनिक संघटना यांच्या वतीने कारगील विजय दिवस साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कारगील युद्धातील शूरवीरांना अभिवादन करण्यासाठी बार्शी तालुका माजी सैनिक संघटना यांच्या वतीने कारगील विजय दिवस शहीद स्मारक येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विधानपरिषदेचे आमदार राजेंद्र राऊत उपस्थित होते. त्यांनी शहीद जवानांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली आणि दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

आमदार राजेंद्र राऊत म्हणाले की,आजचा दिवस हा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आणि श्रद्धेचा दिवस आहे. कारगीलच्या दुर्गम शिखरांवर देशासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या आपल्या शूर जवानांच्या शौयार्ला आणि त्यागाला मी कोटी कोटी नमन करतो. त्यांच्या बलिदानामुळेच आज आपण शांततेने आणि अभिमानाने जगत आहोत. कारगील युद्ध हे केवळ एक युद्ध नव्हते, तर ते आपल्या सैन्याच्या पराक्रमाची, एकजुटीची आणि राष्ट्रभक्तीची पराकाष्ठा होती. प्रतिकूल परिस्थितीत, उंच बर्फाच्छादित शिखरांवर लढून पाकिस्तानला धूळ चारणाऱ्या आपल्या वीरांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले की भारतीय सैनिक काय करू शकतो.बार्शी तालुका माजी सैनिक संघटनेचे मी विशेष अभिनंदन करतो. शहीदांच्या स्मृती जपण्यासाठी आणि नवीन पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी ते जे काम करत आहेत ते अत्यंत स्तुत्य आहे. शहीदांच्या कुटुंबीयांची काळजी घेणे, त्यांचा सन्मान करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. कारगील विजय दिवसाच्या निमित्ताने बार्शी तालुका माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी व माजी सैनिक यांनी सांगितले की,25 वर्षांपूर्वी कारगीलच्या बर्फाळ शिखरांवर आपल्या जवानांनी जे शौर्य दाखवले, त्याची गाथा आजही आमच्या अंगावर काटा आणते. आम्ही सैनिक असलो तरी त्या युद्धात शहीद झालेल्या आमच्या बांधवांच्या त्यागासमोर आम्ही नतमस्तक आहोत.कारगीलचा विजय हा केवळ लष्कराचा विजय नव्हता, तर 140 कोटी भारतीयांचा विजय होता. त्या दिवशी प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीचा अभिमान जागा झाला होता.आज आमदार राजेंद्र राऊत साहेबांनी शहीद स्मारकावर येऊन आम्हाला दिलेला मान-सन्मान आमच्यासाठी खूप मोठा आहे. शहीदांच्या कुटुंबीयांना शासनाने दिलेल्या सर्व सुविधा वेळेवर मिळाव्यात आणि त्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी आमची मागणी आहे.आम्ही तरुण पिढीला आवाहन करतो की मोबाईल बाजूला ठेवून देशासाठी काहीतरी करा. सैन्यात भरती व्हा, देशसेवा करा. कारण देश आहे तर आपण आहोत. यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील,आसिफ तांबोळी जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य,बार्शी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ.तेजस्वीनी कथले,बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड,उपनगराध्यक्ष रोहित पाटील,पंचायत समिती सभापती सौ. मिनाक्षीताई रोंगे,संभाजी घाडगे तसेच सुभेदार चांगदेव सुरवसे (सें. निवृत्त) (अध्यक्षः माजी सैनिक संघटना, बार्शी) व बार्शी तालुका माजी सैनिक संघटना संचालक मंडळ व सर्व सभासद व इतर प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाशी सुसंगत बँकिंग काळाची गरज- खडके
## मनोरमा बँकेच्या अंत्रोळकर नगर शाखेचे उद्घाटन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** देशातील नागरी सहकारी बँकांवर सामान्य नागरिकांचा विश्वास दिवसेंदिवस वाढत असून, ग्राहकांना अत्याधुनिक डिजिटल सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. सहकार क्षेत्राची ताकद सामान्य माणसापर्यंत पोहोचण्यात आहे. बदलत्या बँकिंग व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहककेंद्रित सेवा देणाऱ्या सहकारी बँकाच भविष्यात यशस्वी ठरतील, असे प्रतिपादन कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष संजीव खडके यांनी केले.

रविवारी,होटगी रस्त्यावरील मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अंत्रोळकर नगर येथील ११व्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाइन माध्यमातून प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे होते.

यावेळी लोकमंगल बँकेचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख, पुणे पीपल्स मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) मुकुंद पवार, उपनिबंधक उमेश पवार, जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१) व्ही. व्ही. डोके, मनोरमा मल्टीस्टेटच्या अध्यक्षा शोभा मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी, डॉ. ऋचा मोरे-पाटील, डॉ. सुमित मोरे, धनश्री परिवाराचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव काळुंखे, सांगलीचे नायब तहसीलदार जितेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

खडके म्हणाले, जगभरात सहकार चळवळीचे महत्त्व सातत्याने वाढत आहे. सुमारे ९० हजार सहकारी संस्था कार्यरत असून, ४११ कोटी सदस्य या व्यवस्थेशी जोडले गेले आहेत. जागतिक स्तरावर सहकारी



संस्थांची मालमत्ता चार ट्रिलियन डॉलर इतकी आहे. भारतातील नागरी सहकारी बँकांची एकूण ठेव सहा लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, सामान्य नागरिकांपर्यंत आर्थिक सेवा पोहोचविण्याची सर्वाधिक क्षमता सहकार क्षेत्रात आहे. बदलत्या काळानुसार मोबाईल बँकिंग, डिजिटल व्यवहार आणि तंत्रज्ञानाधारित सुविधा अधिक सक्षम करणे आवश्यक असून, ग्राहकांच्या गरजांनुसार सेवा देणाऱ्या सहकारी बँकांचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात डॉ. ऋचा मोरे-पाटील यांनी बँकेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. मागील सलग आठ वर्षे बँकेने शून्य टक्के एनपीएची कामगिरी कायम राखली असून, भारतीय रिझर्व्ह बँकेकडून एफएसएम दर्जा आणि आदर्श बँक पुरस्कार प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. बँकेची व्यवसायवाढ आता १,१७० कोटी रुपयांच्या टप्प्याकडे वाटचाल करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

शोभा मोरे यांनी स्वागतपर भाषणात बँकेने कोअर बँकिंग प्रणाली प्रभावीपणे कार्यान्वित केली असून, तंत्रज्ञानाचा वेगाने स्वीकार करणाऱ्या बँकिंग क्षेत्रात सतत अद्ययावत राहण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

आमदार देशमुख म्हणाले, आज सिबिल स्कोअरच्या आधारे कर्ज वितरण अधिक पारदर्शक झाले आहे. ग्राहकांना कमी व्याजदरात कर्ज मिळावे, अशी अपेक्षा असते. सहकारी बँकेचा खरा मालक सभासद असल्याने त्यांचा विश्वास जपणे महत्त्वाचे आहे.

लोकमंगल बँक आणि मनोरमा परिवाराने भविष्यात एकत्रितपणे काम केल्यास सोलापूरच्या सहकार क्षेत्रात मोठी क्रांती घडू शकते. स्थानिक युवकांसाठी रोजगारनिर्मितीतही सहकारी बँकांची महत्त्वाची भूमिका राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे पीपल्स मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड आणि व्ही. व्ही. डोके यांनीही सहकार क्षेत्रातील बदलत्या आव्हानांवर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात श्रीकांत मोरे यांनी मनोरमा बँकेच्या तीन दशकांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला.

सहकार क्षेत्रात अनेक अडचणींवर मात करत बँकेने प्रगती साधली असून, ठेवींची गुणवत्ता, कमी खर्चातील ठेवी वाढविणे, एनपीए नियंत्रणात ठेवणे आणि शाश्वत आर्थिक व्यवस्थापन या बाबींवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पल्लवी पवार यांनी सूत्रसंचालन, तर उपाध्यक्ष संतोष सुरवसे यांनी आभार प्रदर्शन केले.

# प्राचार्य डॉ. शंकर नवले यांना ‘प्राचार्य के. पी. मंगळवेढेकर गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार २०२६’ जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूरचे प्राचार्य प्रा. डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांची ‘प्राचार्य के. पी. मंगळवेढेकर गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार २०२६’ साठी निवड झाली आहे. शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, संस्थात्मक विकास आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल व हरिभाई देवकरण प्रशाला (१९६१ च्या ११ वीच्या बॅच), सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय, कसबा चौक, सोलापूर येथे होणार आहे. या कार्यक्रमात सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी नारायणराव शिंदे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, लायन्स क्लबचे गव्हर्नर ला. राजेंद्र शहा-कांसवा (PMJF) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



प्रा. डॉ. नवले हे १३ नोव्हेंबर २०१४ पासून एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेकडून (NAAC) सलग दोन वेळा ‘A’ श्रेणी, विद्यापीठाच्या AAA मूल्यांकनात ‘E++’, शिक्षण मंत्रालयाच्या ARIIA आणि इनोव्हेशन सेलकडून राष्ट्रीय स्तरावरील मान्यता, तसेच संशोधन, नवोपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

डॉ. नवले यांनी शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथून पदविका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून अभियांत्रिकी पदवी, तर मुंबई विद्यापीठातून एम.टेक. व पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. पीएच. डी. संशोधनाचा काही भाग त्यांनी रोम विद्यापीठ, इटली येथे पूर्ण केला असून, ग्रेनोबल विद्यापीठ, फ्रान्स येथे पोस्ट-डॉक्टोरल संशोधनही केले आहे. त्यांना इरास्मस मुंडुस शिष्यवृत्ती आणि युरोपियन आयोग फेलोशिप यांसारखे आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत.

संशोधन क्षेत्रात त्यांनी ३० संशोधन लेख, २० संशोधन सादरीकरणे, ४ पुस्तके, ४ पेटंट, २ कॉपीराइट तसेच अनेक संशोधकांना पीएच.डी. मार्गदर्शन केले आहे. शिक्षण, संशोधन आणि प्रशासन क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना यापूर्वी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शिक्षक प्रेरणा पुरस्कार, सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, युवा शैक्षणिक नेतृत्व पुरस्कार, सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्कार यांसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

या नव्या पुरस्कारामुळे सिंहगड परिवारात आनंदाचे वातावरण असून, संस्थेचे सहसचिव तथा कॅम्पस संचालक संजय नवले, पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. नवले यांचे अभिनंदन केले आहे.

# अकलूज येथे लोकमंगल पतसंस्थेतर्फे गरजू विद्यार्थ्यांना वही वाटप



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** लोकमंगलचे संस्थापक तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या सूचनेनुसार लोकमंगल पतसंस्था, शाखा अकलूज यांच्या वतीने अकलूज येथील दत्तनगर (राऊत नगर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ७ वीतील गरजू व अत्यंत गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.


कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक नकातेसर यांनी प्रास्ताविक करून या उपक्रमाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पंढरपूर विभागाचे विभागीय अधिकारी दिगंबर जाधव, शाखाधिकारी जगदीश पाटील, लोकमंगल पतसंस्थेचे कर्मचारी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

लोकमंगल पतसंस्थेच्या या सामाजिक उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मोलाची मदत मिळाली असून, त्यांच्या शिक्षणाला निश्चितच प्रेरणा व बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# विठ्ठल नामाच्या गजरात एमआयटी व्हीजीएसमध्ये रंगला आषाढी सोहळा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती इंग्लिश मीडियम हायस्कूल, बार्शी येथे आषाढी एकादशीचा पवित्र सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्म, संस्कार आणि संतपरंपरेची ओळख निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका रेखा पाटील यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी समवेत पालखी पूजन करून करण्यात आली. बाल वारकऱ्यांचा शाळा परिसर व भगवंत मंदिरात 'ज्ञानोब- तुकाराम' आणि विठ्ठल नामाच्या गजरात दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यानंतर कार्यक्रमात भक्तिगीते, भजन, अभंगगायन



तसेच संतांच्या जीवनावरील आणि विठ्ठलभक्तीवरील कथा सादर करण्यात आल्या.

संत गोरा कुंभार यांच्या विठ्ठलभक्तीवर आधारित समूहनृत्याद्वारे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलाविष्कार सादर केला.

मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांना संतांच्या विचारांचे आचरण करण्याचा संदेश देत आषाढी एकादशीचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले. विठ्ठल नामाच्या गजरात कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक विभाग तसेच विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# तात्काळ उपचारामुळे हृदयविकाराच्या झटका आलेल्या 6 वारकऱ्याना मिळाले जीवनदान

**पंढरपूर:-** आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांना उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारची आरोग्य सेवा देण्यात आली. यामध्ये तीव्र हृदयविकाराच्या झटका आलेल्या 6 वारकऱ्यांना उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे तात्काळ उपचार देण्यात आल्याने त्यांचे जीव वाचविण्यात यश आले असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजयकुमार सरडे यांनी दिली.

उपचारामध्ये दिगंबर जाधव, वय ६०, रा. हदगांव, जिल्हा नांदेड, पार्वती गोडगे रा. मालेगाव जिल्हा सोलापूर,)कमलाबाई बुगडे वय 60 रा. मोहगाव, जिल्हा -वर्धा, भैरूनाथ असकुले वय 34,रा कळंब जिल्हा धाराशिव, छबूताई अकोलकर वय 73 रा. अकोला, महेश कदम वय 51रा. तुळजापूर या वारकरी भाविकांना तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याने सदरील रुग्ण तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे दाखल करण्यात आले होते.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्याचे आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक डॉ. भगवान पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार सरडे, आयसीयू नोडल अधिकारी डॉ. महेश कुमार सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली फिजिशियन डॉ. सीमा इंगोले यांनी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे हृदयविकाराचा तीव्र झटका आलेल्या 6 रुग्णाचा इसीजी काढून तातडीने रुग्ण आयसीयू मध्ये दाखल केले व त्यांना थ्रोम्बोलायसिस करण्यात आले.सदरील 6 रुग्णांना वेळेत थ्रोम्बोलायसिस उपचार देण्यात आले. या उपचारामुळे रक्तवाहिनीतील अडथळा दूर करण्यात मदत झाली आणि रुग्णांची स्थिती स्थिर करण्यात आली. त्यानंतर आवश्यक वैद्यकीय उपचार व सतत देखरेखीखाली रुग्णाची प्रकृती सुधारली. सध्या संबंधित वारकरी भाविकाची प्रकृती चांगली असून त्यांना पुढील योग्य त्या उपचारासाठी संदर्भित केले आहे, अशी माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार सरडे यांनी दिली.

# व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थी मेळावा 2026 उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा.पी.पी. कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख यांनी प्रस्तावनेत उपस्थितांचे स्वागत करून यावर्षी झालेल्या उत्कृष्ट प्लेसमेंट बद्दल माहिती दिली. त्यानंतर स्थापत्य अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. अविनाश पाटील यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंत झालेल्या विकासाचा आढावा सादर केला. डॉ. ए. एस. विभुते, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे विभाग प्रमुख यांनी महाविद्यालयाने गुगल स्किल, रेड हॅट यांसारख्या जागतिक कंपन्यांशी भागीदारी केली असून, या माध्यमातून उपलब्ध होणारे विविध कौशल्यविकास अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन. गायकवाड यांनी माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देत महाविद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षण कमी खर्चात उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्थापन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तसेच



महाविद्यालयातील विविध शैक्षणिक सुविधा, आठ पीएच.डी. पदवीधारक प्राध्यापक आणि एकोणीस पीएच. डी. संशोधन करणारे प्राध्यापक कार्यरत असल्याची माहिती दिली. तसेच प्रकल्प आधारित शिक्षण, संशोधनास चालना आणि विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात सुरू केलेले स्टार्ट अप्स इत्यादीचा आढावा घेतला.

संस्थेचे व्हाईस चेअरमन एम. एल. कटकधोंड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी विद्यार्थी सोमय्या अवधूत यांनी कठोर परिश्रम, शिस्त आणि योग्य दिशा यामुळेच यश मिळाल्याचे सांगितले. संतोष उमरगे यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत करिअरमधील विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच साबीर नाईकवाडी आणि स्वराली यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व शिक्षण घेत असताना मिळालेल्या सोयी सुविधा तसेच संधी याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून संस्थेचे संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख यांनी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे आजीवन सभासद असून, शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन त्यांचे करिअर घडविण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण उपस्थित होते. तसेच कॉम्प्युटर डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख डॉ. प्रीती देशमुख, इलेक्ट्रिकल डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख डॉ. एस.एस. स्वामी, मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे विभाग प्रमुख डॉ. एस.डी. डोंगरे, बी.सी.ए.चे विभाग प्रमुख डॉ. एस. आर. आळंद, प्रथम वर्ष विभाग प्रमुख जे. के. रोमन तर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य संतोष माने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भवानी मॅडम यांनी केले, तर प्रा. सय्यद यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.